# MT- 162

**Seat No.** | | | | | | | |

**2014 .... .... 1100**

**MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM II - PAPER - V**

**Time : 3 Hours** **(Pages 5)** **Max. Marks : 80**

---

**प्र.1. अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** **4**

1) आपणाला एकमेकांचे अनेक गुणदोष एकमेकांच्या जीवनातले ..........

अ) अनेक बरेवाईट तपशील ठाऊक असतात.

ब) अनेक वाईटबरे तपशील ठाऊक असतात.

क) अनेक अविस्मरणीय तपशील ठाऊक असतात.

2) तुमच्या कुंचल्यानं ती कागदावर उतरलेली पाहण्यासाठी ..........

अ) मी आतूर आहे. ब) मी बेचैन आहे. क) मी उत्सुक आहे.

3) निखळ आनंद घेताना धर्माच्या भिंतींनी कधी ..........

अ) द्वेष केला नाही. ब) अडवणूक केली नाही. क) अडसर केला नाही.

4) बाबूजी घरी निघून गेल्यावर केशवने ..........

अ) चौकशीही केली नाही. ब) सरिताशी भांडण केले. क) आरडाओरडा केला.

**प्र.1. आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** **3**

1) चोरली जाऊ शकत नाही, इतकी .......... आहे. (शाश्वत, अक्षय, अजय)

2) एखाद्या कामाची .......... यामुळेही आपली ओळख स्पष्ट होते ?

(सहजता, जबाबदारी, बांधिलकी)

3) तट्ट्याच्या झोपडीत बाबा आणि ताईंनी .......... महाल बांधले.

(स्वप्नांचे, काचेचे, दगडांचे)

**प्र.1. इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

1) स्वामी विवेकानंद कोणता आहार घेत असत ?

2) पुस्तकराव एक प्लेट काय द्यायला तयार आहेत ?

3) एखाद्या बालकाप्रमाणे रंग वेचत दूर कुठे भटकत जावं ?

**प्र.2. अ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **3**

1) ''आणि मास्तर त्या गराड्यात अगदी आनंदाने गुरफटून गेले.''
2) ''आपण बाहेर पडायचं आणि बघायची जागा सापटीत, वळचणीच्या जागी, जी असेल कोरडी आणि माणसाच्या दृष्टीनं अडनिडी.''

**प्र.2. आ) खालीलपैकी कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

1) राजा रविवर्मा स्वामीजींच्या व्यक्तिमत्त्वाकडे भारल्यासारखे का पाहत होते ?
2) नागिणीचे शहाणपण कोणत्या प्रसंगातून दिसून येते ?
3) आनंदवन कसं निर्माण झालं ?
4) केशव आपल्या बंगल्याचे वर्णन कसे करतो ?
5) मित्रमंडळींशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद हा 'मोकळा संवाद' का असू शकत नाही ?

**प्र.3. अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

1) पांडुरंग कोणाचा सांभाळ करतो?
2) खुरटी झुडपे कशाला भिडावीत, असे कवी म्हणतो?
3) सावळ्या रूपातील श्यामला कोणते गीत आवडते ?

**प्र.3. आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** **3**

1) नाही माझ्या घरट्यांत .......... झंकार (सातसूरांचा, स्वरतालाचा, तालसुरांचा)
2) .......... रंग वेगळे, तरिही त्यांची एक कमान. (इंद्रधनूचे, मोरपीसाचे, फुलपाखराचे)
3) तरी ओळख होतसे अमुची .......... नावाने. (शहराच्या, गावाच्या, शाळेच्या)

**प्र.4. अ) कोणत्याही <u>एका</u> पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** **3**

1) 'अभ्रीची छाया काय साच खरी । तैसीच हे परी संसाराची ।।'
2) 'सोसून सोसून किती गं सोसावं, गिळून दुःख सारं, साऱ्या जगा पोसावं
करूनी मनाची माती, जपुनी नातीगोती, सावरीत जखम खोल, जगाचा आला जरी बोल
चिरड अन्याय, घे हक्क, बनून वाघवाघिणी गं'

**प्र.4. आ) कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

1) संत सेना महाराज यांनी संतांच्या भेटीने होणाऱ्या आनंदाचे वर्णन कसे केले आहे ?
2) कवीच्या मते, परमेश्वराचे दर्शन कोठे-कोठे घडते ?

3) ‘प्रलय’ या कवितेत कवीने माणसाकडून कोणती अपेक्षा केली आहे ?

4) कवीला आपल्या घरट्यात कोणकोणत्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात ?

5) कवयित्रीने एकत्वाचे कोणते विचार कवितेतून व्यक्त केले आहेत ?

**प्र.5. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** **8**

1) पंढरपूर आणि रत्नागिरी या गावांतील कोणती वैशिष्ट्ये लेखकाने वर्णन केली आहेत ?

2) आपण खोटारडेच आहोत, असे चिनारला का वाटले?

3) रेवन्त व अनाहिता यांनी या जगात वावरताना काय केले पाहिजे असे लेखिकेला वाटते ?

4) नागनाथअण्णा यांनी विद्यार्थिदशेत स्वातंत्र्यचळवळीत कसा भाग घेतला ?

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** **8**

1) ‘गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व’ या पाठाचा सारांश लिहा.

2) ‘नातवंडास पत्र’ या पाठाचा सारांश लिहा.

**प्र.6. अ) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार लिहा.** **2**

1) सुतकताई हे उत्पादक शारिरीक परिश्रमांचे प्रतीक मानले जात असे.

2) मुलांचे कौतुक दोघिंनाही सारखेच प्रीय असते.

**प्र.6. आ) खालीलपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** **2**

1) पंचवटी 2) यशापयश 3) नोकरचाकर 4) मायलेक

**प्र.6. इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** **2**

1) तो आता विशाल वृक्ष झाला आहे. (उद्‌गारार्थी करा.)

2) त्याच्याशी बोलला नाहीत तर ते कसे वाढेल ? (विधानार्थी करा.)

3) तू मला चाकू देशील का ? (आज्ञार्थी करा.)

**प्र.6. ई) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** **4**

(क्षीण होणे, सहभागी होणे, भूमिका वठवणे, भूमिगत होणे, दाखल होणे, प्राप्त करणे)

1) पंढरपुरच्या वारीत वारकरी मोठ्या संख्येने सामील झाले.

2) ‘कोकणस्थ’ चित्रपटात सचिन खेडेकर यांनी कोकणी माणसाचे काम केले.

3) स्वातंत्र्याच्या काळात अनेक क्रांतिकारकांनी लपून राहून काम केले.
4) आपल्या मुलांवरील आईची माया कधीही कमी होत नाही.
5) अजयने धावाधाव करून अकोल्याच्या शाळेत प्रवेश घेतला.
6) खूप मेहनत करून आपल्याला कोणतीही गोष्ट मिळवता येते.

**प्र.7. अ) खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** **4**

हिंदी राष्ट्राचा स्वाभिमान आणि स्वातंत्र्यप्रेम जर आज कशामुळे जिवंत राहिले असेल तर ते व्यास, वाल्मिकी, कालिदास, भवभूती, ज्ञानेश्वर, तुकाराम, टागोर आणि गांधी यांच्या अमर साहित्यामुळे आणि सामर्थ्यवान शिकवणुकीमुळे होय, ही गोष्ट त्रिकालाबाधित सत्य आहे. आमच्या पराक्रमाची आणि कर्तृत्वाची ग्वाही देण्यासाठी रामायण-महाभारत हे ग्रंथ जोपर्यंत डोंगरासारखे आमच्या पाठीमागे उभे आहेत, तोपर्यंत भविष्याबद्दल निराश होण्याचे आम्हांला किंचितही कारण नाही. ज्या समाजाजवळ साहित्याचे सामर्थ्य नाही तो समाज पारतंत्र्यातून बाहेर येणे अशक्य आहे. निग्रो लोकांच्या गुलामगिरीचे हेच एक कारण आहे. कोणत्याही देशाच्या विजयाच्या वा स्वातंत्र्याच्या झगड्यात शस्त्रापेक्षा साहित्याचा उपयोग अधिक झालेला आढळून येईल.

**प्र.7. आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** **4**

1) **मुद्दे** : दोन बैल – नेहमी एकत्र – एका सिंहाने पाहणे – सिंहाचा हल्ला – दोन्ही बैलांचा प्रतिहल्ला – सिंहाचे पळून जाणे – सिंहाची युक्ती – दोघांमध्ये भांडण लावणे – दोघे वेगळे होणे – चरण्यासाठी एकटे जाणे – सिंहाला संधी मिळणे – एक एक करून दोघांना मारणे – तात्पर्य.

2) **मुद्दे** : एक वृद्ध शेतकरी – चार मुलगे – आपापसात भांडणे – शेतकऱ्याला चिंता – आजारी पडणे – एके दिवशी चौघांना एकत्र बोलावणे – प्रत्येकास एक एक काठी मोडण्यास देणे – चौघांनी मोडून दाखवणे – प्रत्येकास चार काठ्यांची मोळी तोडण्यास देणे – चौघांचे प्रयत्न असफल – तात्पर्य.

**प्र.7. इ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** **4**

1) संदिप/संदिपा चव्हाण, संजीवनी निवास, मुलुंड (प.) मुंबई येथून दूषित पाण्याबाबत मा. पाणीपुरवठा अधिकारी,मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना पत्र लिहितो / लिहिते. (लिफाफा आवश्यक)

2) दिपक/ दिपिका काळे, सहलप्रमुख, सरस्वती विद्यालय, तुळशीबाग, पुणे हा/ही मा. आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ, पुणे यांच्याकडे सहलीसाठी बसची मागणी करतो/करते. या पत्राचा नमुना तयार करा. (लिफाफा आवश्यक)

<u>**किंवा**</u>

**खालील विषयावर वृत्तांत लिहा.** **4**

तुमच्या गावात साजरा झालेल्या श्रमदान शिबिराचा वृत्तांत लिहा.

<u>**किंवा**</u>

**खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** **4**

स्टेशनरीच्या दुकानाची जाहिरात करा.

**प्र.8. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** **10**

1) पाऊस पडला नाही तर.....

**मुद्दे** :- पावसाचे महत्त्व - जीवन जगण्यासाठी आवश्यक - पाण्याची आवश्यकता - नदी, नाले, कोरडे - मानव, पशू, पक्षी - भयानक वातावरण - कल्पनाच भयंकर - शेवट.

2) फळ्याचे आत्मवृत्त

**मुद्दे** :- प्राचीन रूप - काळाची गरज - प्राथमिक अवस्था - सेवाभावी वृत्तीमुळे समाधानी - वर्गात पडणाऱ्या चांगल्या वाईट घटनांचा साक्षीदार - आधुनिकतेचा प्रभाव - परोपकारी वृत्तीमुळे जीवनात समाधानी.

3) शालेय जीवनातील आठवणी

**मुद्दे** :- शालेय जीवन - सुखद अनुभव - शालेय जीवन एक आयुष्याची शिदोरी - शाळेतील पहिला दिवस - शाळेतील प्रत्येकाशी जडलेले नाते - मिळवलेली बक्षिसे - केलेल्या खोड्या व त्यामुळे शिक्षकांकडून झालेली शिक्षा - तरीही शाळेविषयी असणारे प्रेम - भविष्याची वाटचाल.

**Best Of Luck** 👍

**PAPER - V**

# MT-162

**2014 .... .... 1100**

**MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM II - PAPER - V**

**Time : 3 Hours** **Preliminary Model Answer Paper** **Max. Marks : 80**

| | | |
|---|---|---|
| उ. **1.** | **अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| 1) | आपणाला एकमेकांचे अनेक गुणदोष एकमेकांच्या जीवनातले <u>**अनेक बरेवाईट तपशील ठाऊक असतात.**</u> | **1** **1** |
| 2) | तुमच्या कुंचल्यानं ती कागदावर उतरलेली पाहण्यासाठी <u>**मी उत्सुक आहे.**</u> | **1** |
| 3) | निखळ आनंद घेताना धर्माच्या भिंतींनी कधी <u>**अडसर केला नाही.**</u> | |
| 4) | बाबूजी घरी निघून गेल्यावर केशवने <u>**चौकशीही केली नाही.**</u> | **1** |
| उ. **1.** | **आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** | |
| 1) | चोरली जाऊ शकत नाही, इतकी <u>**शाश्वत**</u> आहे. | **1** |
| 2) | एखाद्या कामाची <u>**बांधिलकी**</u> यामुळेही आपली ओळख स्पष्ट होते ? | **1** |
| 3) | तट्ट्याच्या झोपडीत बाबा आणि ताईंनी <u>**स्वप्नांचे**</u> महाल बांधले. | **1** |
| उ. **1.** | **इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| 1) | स्वामी विवेकानंद फलाहार आहार घेत असत. | **1** |
| 2) | पुस्तकराव एक प्लेट गोष्ट द्यायला तयार आहेत. | **1** |
| 3) | एखाद्या बालकाप्रमाणे रंग वेचत दूर सागरकाठी भटकत जावं. | **1** |
| उ. **2.** | **अ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** | |
| 1) | <u>**संदर्भ**</u> : वरील वाक्य 'मास्तर आणि मी' या 'कृष्णाबाई नारायण सुर्वे' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखिकेने मास्तरांच्या आणि त्यांच्या नात्याचे वर्णन केले आहे.<br><u>**स्पष्टीकरण**</u> : 'माझे विद्यापीठ' हे पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर कवी नारायण सुर्वे फारच प्रसिद्ध झाले. ते स्वतः कधीही कॉलेजची पायरी चढले नव्हते, पण त्यांच्या कविता तेरावी, चौदावीची मुले अभ्यासत होती. मास्तरांसाठी हे सर्व नवीनच होते. पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर मास्तरांना अनेक कॉलेजांत व्याख्यानं देण्यासाठी बोलावले जाऊ लागले. कार्यक्रमांचे दौरे वाढले. वेगवेगळ्या समित्यांवर, अभ्यास मंडळांवर त्यांची नियुक्ती झाली. अनेक बड्या मंडळींसोबत मास्तरांना काम करण्याची संधी मिळाली.<br>हे सर्व मास्तरांच्या आवडीचेच होते. त्यामुळे मास्तर त्या कामाच्या गराड्यात अगदी आनंदाने गुरफटून गेले.<br><u>**वैशिष्ट्य**</u> : जीवनाच्या उद्दिष्टपुर्तीतून मिळत जाणारा आनंद येथे दिसून येतो. | **3** |

| | | |
|---|---|---|
| 2) | **संदर्भ** : वरील वाक्य 'वारूळ' या लेखक 'अनिल त्र्यंबक अवचट' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखकाने वारूळाविषयी मुंग्यांची भावना तसेच मुंग्या आणि नागिणीचे परस्परसंबंध स्पष्ट केले आहेत.<br>**स्पष्टीकरण** : नागिणीची पिल्लं मोठी झाल्यावर मुंग्यांच्या पिल्लांबरोबर वारूळाच्या बाहेर जाऊ लागली. मुंग्यांची पिल्ले त्यांना आसपासचे रस्ते माहीत करून देत असत. त्यावेळी बोलता-बोलता त्यांना ते वारूळ पावसाळ्यात वाहून जाणार असल्याचे समजले. तेव्हा ती पिल्ले खूपच घाबरली. त्यांनी त्याबद्दल आईला विचारले. त्यावेळी तिने पावसाळ्यात दरवर्षी असेच घडत असल्याचे सांगितले, ती त्यांची भीती दूर करताना म्हणाली की, पावसाला सुरूवात व्हायच्या आधी आपण बाहेर पडू. नंतर सापटीत म्हणजेच खिंडारात किंवा वळचणीच्या जागी म्हणजेच छतावर राहण्यासाठी जागा बघू. ती जागा कोरडी असेल. तसेच माणसांच्या दृष्टीने अडनिडीची म्हणजेच अडगळीची असेल. माणसांची नजर न गेल्याने ती सुरक्षित जागा असेल.<br>**वैशिष्ट्य** : नागिणीची जगण्यासाठीची धडपड येथे दिसून येते. | **3** |
| उ.**2.** | **आ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| 1) | 'अपूर्व भेट' हा पाठ लेखक 'रणजित देसाई' यांनी लिहिला आहे. या पाठात स्वामी विवेकानंदांचे भावचित्र राजा रविवर्मा यांना कसे भावले याचे चित्रण आलेले आहे.<br>राजा रविवर्मा यांच्या घरी आलेले स्वामी विवेकानंद उंचपुरे, गौरकांती लाभलेले होते. पायातील खडावा वाजवत धीम्या पावलांनी ते आत येत होते. त्यांच्या मस्तकी भगवा साफा होता. त्यांच्या अंगात भगवा अंगरखा आणि त्याच रंगाचे पायी धोतर होते. स्वामींच्या गोऱ्या कपाळाखाली असलेल्या काळ्याभोर नेत्रांत एक अलौकिक तेज सामावलेलं होते. त्या तेजस्वी नेत्रांत शांत भाव तरळत होता. स्वामीजींचे ते तेज पाहून राजा रविवर्मा प्रभावित झाले. स्वामीजींच्या दर्शनाने त्यांचे अंतःकरण आनंदाने भरून गेले.<br>अशाप्रकारे स्वामी विवेकानंदांच्या तेजःपुंज व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झाल्याने राजा रविवर्मा भारल्यासारखा स्वामीजींकडे पाहत होते. | **3** |
| 2) | 'वारूळ' हा पाठ लेखक 'अनिल त्र्यंबक अवचट' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने वारुळाविषयी मुंग्यांची भावना तसेच मुंग्या आणि नागिणीचे परस्परसंबंध स्पष्ट केले आहेत.<br>नागिणीच्या मुलांनी मुग्यांना वारूळ बनवताना मातीमध्ये सिमेंट मिसळा, घर वॉटर प्रूफ करून घ्या, असे काही बदल सुचवले. त्यावेळी नागिणीला आपली मुले माणसांच्या वळणावर जातात की काय अशी भीती वाटली. त्यावेळी मुलांना थांबवत ती म्हणाली की, नाग जेव्हा अन्न मिळवायला बाहेर फिरतात तेव्हा माणसे त्यांना दगड मारून त्रास देतात. नागांनी उंदीर खाल्ले तर माणसाचाच फायदा होणार असतो, पण हे त्यांना कळत नाही. जमीन भुसभुशीत करणारी वारूळे शेतात तयार केली की माणूस ती नांगरून, तोडून | **3** |

| | | |
|---|---|---|
| | टाकतो. शिवाय माणसांनी सर्वत्र सिमेंट आणि डांबरी रस्ते बनवलेले आहेत. त्यांच्यामुळे सूर्यकिरण जमिनीपर्यंत पोहोचतच नाही. त्यामुळे प्राण्यांनी जगायचं कसं हा प्रश्न निर्माण झाला आहे. खरे तर सारे जीव एकमेकांवर अवलंबून असतात आणि त्यामुळेच ही सृष्टी चालते. परंतु मनुष्य अविचाराने वागून स्वतःही मरेल आणि इतर उपयोगी प्राण्यांनाही मारेल. नागिणीचे निसर्गाचा समतोल साधण्यासाठीचे विचार मुंग्या शांतपणे ऐकत होत्या.<br>वरील प्रसंगातूनच नागिणीचे शहाणपण दिसून येते. | |
| 3) | 'माणुसकीचा झरा' हा पाठ लेखिका 'चित्रलेखा पुरंदरे' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने 'आनंदवन' ही कुष्ठरोग्यांची वसाहत निर्माण करण्यामागे बाबा आमटे यांची असलेली संवेदनशीलता दाखवून दिली आहे.<br>एक दिवस रस्त्याच्या कडेला असह्य वेदनांनी कण्हत असलेला, नासलेल्या शरीराचा तुळशीराम बाबांना दिसला. त्याची ती दुरावस्था बघून त्यांना खूप दुःख झाले. त्यावेळेपासूनच बाबांनी घरची श्रीमंती आणि सर्व सुखांचा त्याग करून आपले जीवन कुष्ठरोग्यांसाठी समर्पित केले. एका गरीब कुष्ठरोग्याला घरी आणून त्यांनी सर्व नातेवाईकांचा विरोध ओढावून घेतला. परंतु, याचवेळी सोबत म्हणून साधनाताईंच्या रूपात एक जीवाभावाचा माणूसही मिळाला. कष्टांशिवाय जीवन नाही, त्यागाशिवाय सुख नाही असे मानणाऱ्या साधनाताईंनी बाबांना संपूर्ण साथ दिली. परंतु दुर्दैवाने याचवेळी वेळेवर योग्य ते उपचार न झाल्याने, महारोग झालेल्या तुळशीरामाचा मृत्यू झाला. त्यावेळी दुःखी झालेल्या बाबांनी ताईंजवळ आपल्या अस्वस्थतेची, दुःखाची कबुली दिली. या दुःखाची तीव्रता कशी कमी करता येईल, वेदनेचे आनंदात कसे रूपांतर होईल हा ध्यास यावेळी या पतीपत्नीला लागला. या ध्यासातूनच आनंदवनाची निर्मिती झाली.<br>अशाप्रकारे कुष्ठरोग्यांच्या दुःखाच्या सहानुभूतीतून आनंदवन निर्माण झाले. | 3 |
| 4) | 'बाबूजी' हा पाठ लेखक 'संजय गिरासे' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने आपल्या मुला-मुलींसाठी आयुष्यभर कष्ट करणाऱ्या आईवडिलांकडे मुलांनी केलेल्या दुर्लक्षामुळे संवेदनशील मनाला खूप यातना होतात, याचे दर्शन घडविले आहे.<br>केशवने नाशिकला एक छोटासा बंगला बांधला होता. या बंगल्याला त्याने आपल्या वडिलांचे म्हणजे 'बाबूजी' हे नाव दिले होते. बंगल्याचा दिवाणखाना दृष्ट लागावी असा होता. त्याने हॉल, किचन, बेडरूम सगळीकडे स्पार्टेक बसवून घेतले होते. किचनच्या ओट्याला पंचवीस हजार रूपये खर्च आला होता. नऊ फूट लांबीचा ओटा होता आणि त्यावर ग्रीन मार्बल बसविले होते. साडेआठशे रूपयांचा नळ होता. त्याचबरोबर मिस्तरीला सांगून चार खुर्च्यांचा डायनिंग टेबल बनवून घेतला होता. बाथरूमला बसवलेली वॉल टाईल्स खास इंदौरहून आणलेली होती. बेडरूम दुसऱ्या मजल्यावर होती. फॅशन नसल्यामुळे बाबूजींचा फोटो हॉलऐवजी जिन्यामध्ये लावला होता. बेडरूमच्या सजावटीसाठी पंचेचाळीस हजार खर्च केले होते. खिडक्यांना दोन्ही बाजूंनी ग्रील लावली होती. स्टोअर रूम चांगली होती. गच्चीवर त्याने | 3 |

| | | |
|---|---|---|
| | झोपाळा लावला होता. वर लाईट लावलेला होता. शिवाय बंगल्याला 'बाबूजी' हे जे नाव दिले होते. ते खास ऑर्डर देऊन पुण्याहून बनवून घेतलं होतं. त्याला मर्क्युरी कोटिंग होती. त्यामुळे बंगल्याच्या जवळून जाणाऱ्या मेन हायवेवरून ते नाव ठळकपणे दिसतं. त्या नावामुळे बंगल्याला उठाव आलेला होता. या सगळ्याबरोबरच केशवने सुरक्षिततेसाठी दरवाजादेखील मजबूत करून घेतला होता. शिवाय चोरांनी कशाही प्रकारे दरवाजा उघडलाच तर आपोआप वाजणारी एक इलेक्ट्रॉनिक बेलही तेथे लावलेली होती.<br>अशाप्रकारे केशवने आपल्या ऐश्वर्यसंपन्न बंगल्याचे वर्णन केले आहे. | |
| 5) | <u>'संवाद, विसंवाद'</u> हा पाठ लेखिका <u>'शांता शेळके'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने संवादाच्या विविध प्रकारांबद्दल त्यांतील अडथळ्यांबाबत माहिती सांगितली आहे.<br>मित्रमंडळींशी गप्पा मारताना आपली अशी समजूत असते की, आपण खूप मुक्त, मोकळे असतो, पण ते खरे नसते. कारण आपल्याला एकमेकांचे गुणदोष जीवनातले बरेवाईट तपशील ठाऊक असतात. त्यामुळे बऱ्याच वेळा मोकळ्या गप्पा होत असल्या तरी नात्यातल्या जवळीकीमुळे चमत्कारिक अवघडलेपणा वाट्याला येतो. एकमेकांची मते, आग्रहदुराग्रह माहीत असल्यामुळे बऱ्याचवेळा मतभेदाचे विषय आपण टाळतो. वृत्तीतल्या हळव्या जागा, स्वाभिमानाची ठिकाणे माहीत असल्यामुळे समोरच्या व्यक्तीचे मन दुखावले जाणार नाही याची आपण सतत काळजी घेतो.<br>या वरील कारणांमुळे मित्रमंडळींशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद हा 'मोकळा संवाद' असू शकत नाही असे लेखिका म्हणते. | **3** |
| उ.**3.** | **अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| 1) | पांडुरंग भक्तांचा सांभाळ करतो. | **1** |
| 2) | खुरटी झुडपे आकाशाला भिडावीत, असे कवी म्हणतो. | **1** |
| 3) | सावळ्या रूपातील श्यामला श्वासा-घणांचे गीत आवडते. | **1** |
| उ.**3.** | **आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** | |
| 1) | नाही माझ्या घरट्यांत **<u>सातसूरांचा</u>** झंकार. | **1** |
| 2) | **<u>इंद्रधनूचे</u>** रंग वेगळे, तरिही त्यांची एक कमान. | **1** |
| 3) | तरी ओळख होतसे अमुची **<u>गावाच्या</u>** नावाने. | **1** |
| उ.**4.** | **अ) कोणत्याही <u>एका</u> पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** | |
| 1) | **<u>संदर्भ</u>** : वरील पद्यपंक्ती <u>'किती हे सुख'</u> या <u>'संत सोयराबाई'</u> यांच्या अभंगातून घेण्यात आल्या आहेत. या अभंगात स्वतःच्या स्वार्थात, मी पणात गुंतलेल्या व्यक्तीची फजिती होते, याचे वर्णन केले आहे. | **3** |

**स्पष्टीकरण** : माणसे संसारात, प्रपंचात खरे सुख मानतात. मोहमायेत अडकून पडतात. पत्नी, पुत्र यासारख्या नातेसंबंधात त्यांचे मन गुंतलेले असते. धन, संपत्ती या मोहजालात ते गुरफटून पडतात. अशा या संसारातून मिळणारे सुख हे क्षणिक असते. ज्याप्रमाणे आकाशातील ढगांची सावली जरी खरी वाटत असली तरी ती क्षणिक असते. त्याचप्रमाणे संसारातील सुख क्षणभंगूर असते.
**वैशिष्ट्य** : या ठिकाणी संत सोयराबाईंची सूक्ष्म निरीक्षणशक्ती दिसून येते.

2) **संदर्भ** : वरील पद्यपंक्ती 'आपण धरणी गं' या कवी 'ऋषीकेश कांबळे' यांच्या कवितेतून घेण्यात आल्या आहेत. या कवितेत स्त्रीला तिच्या सामर्थ्याची जाणीव करून देत आपले हक्क मिळवण्याचे आवाहन कवितेतील स्त्रीच्या माध्यमातून केले आहे. **3**
**स्पष्टीकरण** : कवितेतील स्त्री म्हणते आपण व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात सतत दुःख, हालअपेष्टा, अपमान, उपेक्षा सोसत असतो. पण हे सगळे सोसूनही कितीही दुःख असले तरी आपल्याला ते विसरून सतत साऱ्या जगाला पोसावं लागतं. आपला मान-अपमान विसरून म्हणजेच मनाची माती करून सगळी नातीगोती जपावी लागतात. कवितेतील स्त्री पुढे म्हणते, या सगळ्या अवहेलना, उपेक्षांमुळे हृदयात झालेल्या जखमा विसरून, समाजाने कितीही बोल लावले तरी आता जागी हो. स्वतःवरील अन्याय निमूटपणे सहन न करता त्याविरूध्द पेटून उठ आणि अन्यायाला चिरडून टाक. तुझे हक्क मिळव. त्यासाठी गरज भासलीच तर वाघवाघिणी बन.
**वैशिष्ट्य** : स्त्रीला तिचे हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करण्याचे आवाहन येथे केले आहे.

उ.**4.** **आ) कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.**

1) 'आजि सोनियाचा दिवस' हा अभंग 'संत सेना महाराज' यांनी लिहिला आहे. या अंभगात संतांच्या सान्निध्यात मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन केले आहे. **3**

संत सेना महाराज म्हणतात की, संतांचे दर्शन झाल्यामुळे हा दिवस माझ्यासाठी सोन्यासारखा झाला आहे. संतांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे त्यांच्या जीवाला सुख प्राप्त झाले आहे. जसे सासरी गेलेल्या मुलीला माहेरची माणसे भेटल्यावर आनंद, सुख प्राप्त होते. तसाच सर्व संतमेळा पाहून आपल्या माणसांना भेटल्याचा आनंद संत सेना महाराज यांना झाला आहे. त्यांच्या मनातील दुःख दूर होऊन त्यांच्या मनाला शांतता प्राप्त झाली आहे. जीवाचा सारा थकवा दूर झाला आहे. अशाप्रकारे संतचरण पाहिल्यामुळे जणू घराला सण उत्सवाचे रूप आले आहे. ज्याप्रमाणे दिवाळी-दसरा आल्यावर मन आनंदी, उत्साही होते त्याप्रमाणे संतांच्या सान्निध्यात मन आनंदाने, सुखाने भरून गेले आहे.

अशाप्रकारे संत सेना महाराज यांनी संतांच्या भेटीने होणाऱ्या आनंदाचे वर्णन केले आहे.

2) 'जिथे राबती हात' ही कविता कवी 'गजानन माडगूळकर' यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने आपल्या जीवनातील श्रमाचे महत्त्व सांगितले आहे. **3**

| | | |
|---|---|---|
| | कवी ग. दि. माडगूळकर म्हणतात की, ज्या ठिकाणी माणसे कष्ट करतात, घाम गाळतात तेथे विविध रूपात परमेश्वर उभा राहतो. शेतकरी आपल्या शेतात खूप राबतात, मेहनत करतात. त्याठिकाणी अन्नाच्या रूपात परमेश्वर उभा राहतो. अशा शेतात परमेश्वराचे सावळे रूप दिसते. पाथरवट लोक रस्त्यावर बसून दगड फोडतात. दगडांना विविध आकार देतात. शिवाय विणकर लोक कापसापासून सुंदर कापड तयार करतात. अशा मेहनत करणाऱ्या लोकांच्या घरी परमेश्वर आनंदाने राहतो.<br>अशाप्रकारे कवीच्या मते, ज्या ठिकाणी कष्ट केले जातात, त्याठिकाणी परमेश्वराचे दर्शन घडते. | |
| 3) | 'प्रलय' ही कविता कवी 'रोहिदास पोटे' यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने माणसातील माणूसपण कोणत्याही बंधनांनी बांधलेले नसावे, असा विचार व्यक्त केला आहे.<br>माणसाने माणसाशी माणूस म्हणूनच वागावे असे कवीला वाटते. असे झाले तर माणूस आणि माणसातील माणुसकी यांच्यात एक अतूट नाते निर्माण होईल व ते कायम टिकून राहील. मातीलाही कष्टाच्या भाकरीचा सुगंध प्राप्त होईल. म्हणजेच कष्टालाही महत्त्व प्राप्त होईल. माणसाने माणसांशी असे वागावे की माणसालाही माणूस म्हणून किंमत प्राप्त होईल.<br>अशाप्रकारे कवीने माणसाकडून माणुसकीची अपेक्षा केली आहे. | 3 |
| 4) | 'माझ्या घरट्यात' ही कविता कवी 'सूर्यकांत खांडेकर' यांनी लिहिली आहे. या कवितेत भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती अधिक महत्त्वाची असते, हा संदेश व्यक्त होतो.<br>कवीला आपल्या घरट्यात हिऱ्यामाणकांच्या राशीपेक्षा भावपूर्ण प्रेमळ अशी श्रीमंत हृदयाची माणसे महत्त्वाची वाटतात. कवीला घरात कल्पफुलांपेक्षा खऱ्या पारिजातकांच्या फुलांचा सभोवार दरवळणारा सुगंध अधिक महत्त्वाचा वाटतो. म्हणजेच खऱ्या प्रेमाचा, पावित्र्याचा गंध कवीला अनमोल वाटतो. कवीला केवळ स्वप्नरंजकतेपेक्षा स्वप्ने साकार करणारी मेहनती माणसे महत्त्वाची वाटतात. घरातील माणसांचा एकमेकांशी असणारा संवाद, विचारांतील एकोपा कवीला अधिक पसंत आहे. घरातील आनंदी वातावरण आणि मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य कवीला अधिक आवडते.<br>अशाप्रकारे कवीला आपल्या घरट्यात भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती दर्शविणाऱ्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात. | 3 |
| 5) | 'एकत्वाचे गीत महान' ही कविता कवयित्री 'आश्लेषा महाजन' यांनी लिहिली आहे. या कवितेत आपल्या देशात विविधतेत एकता कशी नांदते याचे सुंदर वर्णन केले आहे.<br>कवयित्रीने देशातील विविधतेतील एकतेचे वर्णन केले आहे. ज्याप्रमाणे इंद्रधनुष्यात जरी विविध रंग असले तरी त्याची कमान मात्र एकच असते. त्याचप्रमाणे भारतातही आपल्याला विविधतेतील एकता दिसून येते. आपल्या देशात वेगवेगळे प्रांत आहेत. या प्रांतातील लोकांची रूपे, त्यांची भाषा, पूजाअर्चा आणि वेशभूषा यामध्ये विविधता | 3 |

आहे. तरीही येथील लोकांच्या हृदयात वाहणारा प्राणवायू एकच आहे. हा प्राणवायुसुद्धा आपणास समतेची, एकतेची शिकवण देत आहे. उंचच उंच नेहमी फडकणारा तिरंगा ध्वज, लोकांच्या मनातील गंगेचे पावित्र्य आणि हिमनगाच्या उंच रांगा एकत्वाचा संदेश देतात. तसेच येथील चंद्र, सूर्य आणि मातीसुद्धा समानता शिकवतात.

अशाप्रकारे विविधतेतूनच एकत्वाचे अनेक विचार कवितेतून व्यक्त झाले आहेत.

उ.**5.** **खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.**

1) <u>'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व'</u> हा पाठ लेखक <u>'आनंद यादव'</u> यांनी लिहिला **4**
आहे. या पाठात एकच मराठी संस्कृती असलेल्या खेड्यांची, शहरांची वेगवेगळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये व त्यातून दिसणारे त्या त्या गावाचे व्यक्तिमत्त्व यांचे वर्णन लेखकाने केले आहे.

पंढरपुरातील नागरिकांचे स्नान हे चंद्रभागेच्या पाण्यात वेगळ्याच शैलीत चालते. पंढरपुरीच्या चंद्रभागा स्नानाला पावित्र्याचा स्पर्श असतो. श्लोक, मंत्र, स्तोत्र म्हणत, मनात विठ्ठलाचे ध्यान करत स्नान केले जाते. स्नानानंतर लोक घरी न जाता प्रथम विठ्ठल मंदिराकडे जातात व नंतरच घरी जातात. लेखक जेव्हा १९६१ मध्ये पंढरपुरला गेले तेव्हा ते गाव सकाळी आठ वाजेपर्यंत झोपलेले असायचे. प्रत्येक दुकानाच्या आडव्या फळ्यांवर माणसे खुशाल झोपलेली दिसत. पंढरपुरी संस्कृती वेगळ्या उद्योगाची होती. ती वर्षातून दोनदा येणाऱ्या वारीवर बेतलेली असायची. विठ्ठलमंदिर हे त्या संस्कृतीचे केंद्र होते. पंढरपुरीत मठांची संख्या भरपूर आहे. वर्षभर पंचक्रोशीतील आणि वारीच्या वेळी वारकरी तेथे जमत असत. पंढरपुरात गल्ल्यांना, चौकांना तसेच दुकानांनाही साधुसंतांची नावे दिलेली दिसतात.

रत्नागिरी शहरात एकही तालीम नाही. येथील मासळी बाजार खूप मोठा आहे. त्याचा उग्र वास वातावरणात भरलेला असतो. लाल, लाल साध्या रस्त्यांचे देखणेपण रत्नागिरीला लाभले आहे. समुद्राची गाज रात्रभर वातावरणात गंभीरपणे भरून राहते. येथे पावसाळ्यात आणि हिवाळ्यातही थंडी वाजत नाही, याचे लेखकाला आश्चर्य वाटते.

अशाप्रकारे पंढरपूर आणि रत्नागिरी या गावांतील विविध वैशिष्ट्ये लेखकाने वर्णन केली आहेत.

2) <u>'मुलांचे स्वप्न'</u> हा पाठ लेखिका <u>'सोनाली नवांगुळ'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात **4**
मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे.

चिनारचे आई व बाबा दोघंही एक छोटं हॉटेल चालवायचे. दोघेही दिवसभर या ना त्या कामात गुरफटलेले असायचे. आईबाबांची कामांची धांदल चिनारला कळायची. त्याला आपले आईबाबा खूप आवडायचे. चिनारचे आईबाबाही आपल्या चिनारचे कौतुक करायचे. त्याच्या शेजारचेही आपल्या मुलांना सांगायचे, ''बघा...बघा किती शहाणी मुलं आहेत. आईबाबांना दमवत नाहीत. अभ्यास करतात. उलटं बोलत नाहीत.'' खरं तर अशा कौतुकाचा कुणालाही आनंदच होतो. पण चिनारचे आईबाबा हॉटेलात दिवसभर काम करून फार दमायचे. कधी कधी तर चिनारचा अभ्यास घ्यायलाही त्यांना वेळ मिळत

| | | |
|---|---|---|
| | नसे. अशा वेळी आपल्या आईबाबांचे पाय दाबून द्यावेत, डोक्याला तेल लावावे, हॉटेलात काहीतरी मदत करावी असे चिनारला खूप वाटायचं. पण वेळच मिळत नाही. मनातून वाटूनसुद्धा आपण त्यांना काहीच मदत करत नाही. चांगली मुलं सगळ्यांना मदत करतात. आपण मात्र मदत करीत नाही. तरीही आपल्याला लोकांनी चांगलं म्हटलं तर आपण खोटारडेच आहोत, असे चिनारला वाटते.<br>अशाप्रकारे स्तुतीस पात्र नसतानाही लोकांनी केलेल्या स्तुतीमुळे आपण खोटारडे आहोत, असे चिनारला वाटते. | |
| 3) | 'नातवंडांस पत्र' हा पाठ लेखिका 'मृणालिनी साराभाई' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जीवन जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून दिला आहे.<br>लेखिकेला आपल्या नातवंडांबद्दल खूप प्रेम वाटते. तिला वाटते की, या मुलांना लाड करून घेण्याची, भरभरून प्रेम मिळण्याची सवय झाली आहे. सदैव आपली काळजी घेणारे कोणीतरी आहे हा विश्वास या मुलांना वाटतो. पण ही मुले जशी मोठी होतील तसे त्यांच्या लक्षात येईल की, या जगात वेगवेगळ्या वृत्तींची, स्वभावाची माणसे आहेत. घरात मिळणारे सौजन्यपूर्ण वातावरण बाहेरच्या जगात मिळणार नाही. हिंसा, अभिलाषा, मत्सर या अपप्रवृत्ती समाजात पसरलेल्या आहेत. दुर्दैवाने मुलांना शाळकरी वयात या गोष्टी शिकायला मिळत आहेत. लेखिकेला वाटते की, मुलांनी मोठे होता होता या शत्रूंना जिंकायला पाहिजे. त्यासाठी त्यांनी प्रत्येक दिवसाची सुरूवात प्रार्थनेने करावी. खेळ खेळताना एकत्र खेळावे. शिवाय कुणाविरूद्ध द्वेष ठेवू नये. जितक्या जास्तीत जास्त जणांना आनंद देता येईल तेवढा त्यांनी दिला पाहिजे. साऱ्या जगासाठी त्यांनी स्वतः आदर्श बनले पाहिजे.<br>अशा प्रकारे रेवन्त व अनाहिता यांनी या जगात वावरताना सर्वांशी प्रेमाने, आपुलकीने वागावे असे लेखिकेला वाटते. | 4 |
| 4) | 'प्रतिसरकार' हा पाठ लेखक 'नागनाथअण्णा नायकवडी' यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे.<br>१९२० नंतर स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व म. गांधी यांच्याकडे आले होते. सत्य, अहिंसा व सत्याग्रह यांच्या सहाय्याने हा लढा तीव्र बनला होता. याच काळात लेखक नागनाथअण्णा कोल्हापूरला 'प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग'मध्ये राहून शिक्षण घेत होते. लेखकाच्या लहानपणी नाना पाटील यांच्या वाळव्यात सभा होत होत्या. तेव्हा लेखक तिरंगी झेंडा खांद्यांवर घेऊन मिरवणुकीत अग्रभागी असायचे. कोल्हापूरात विद्यार्थिदशेतच लेखक राष्ट्रसेवादलात जाऊ लागले होते. तेथे वैचारिक प्रबोधन होत होते. त्या प्रबोधनामुळे इंग्रजांची सत्ता घालविण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावली पाहिजे ही जाणीव तीव्र होत होती. कोल्हापुरमध्ये त्या काळात स्वातंत्र्य चळवळीचा भाग म्हणून विद्यार्थी चळवळ | 4 |

| | | |
|---|---|---|
| 1) | जोमाने वाढत होती. त्याच निमित्ताने लेखकाने त्याच्या काही विद्यार्थी मित्रांसह मुंबईत धाव घेतली होती. स्वयंसेवकाच्या वेशात प्रवेश मिळविला होता. गांधीजीची पूर्ण स्वातंत्र्याची मागणी व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या भावनाप्रधान व जोशपूर्ण भाषणाने लेखक भारावून गेले आणि शिक्षण सोडून पूर्णपणे स्वातंत्र्याच्या चळवळीत स्वतःला झोकून द्यायला तयार झाले होते.<br>अशाप्रकारे नागनाथअण्णा यांनी विद्यार्थिदशेत स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला.<br>**किंवा**<br>**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.**<br>'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व' हा पाठ लेखक 'आनंद यादव' यांनी लिहिला आहे. या पाठात एकच मराठी संस्कृती असलेल्या खेड्यांची, शहरांची वेगवेगळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये व त्यातून दिसणारे त्या त्या गावाचे व्यक्तिमत्त्व यांचे वर्णन लेखकाने केले आहे.<br>संस्कृतीची बाह्य वैशिष्ट्ये ही गावागावाच्या वैशिष्ट्यांवर आणि शहराशहरांच्या वैशिष्ट्यांवर अवलंबून असतात. हा विचार मांडताना लेखकाने कोल्हापूर, पंढरपूर व रत्नागिरी या तीन गावांच्या संस्कृतींचे वर्णन केले आहे. लेखक म्हणतात की, सकाळच्या वेळी कोल्हापुरच्या रस्त्यावरून लांब शिंगाच्या गवळट म्हशी दूधकट्ट्यावर दुधाच्या धंद्यासाठी जात असतात. त्याचवेळी पैलवानांचे समूह हातात कल्हई केलेल्या पितळी बादल्या घेऊन दूधकट्ट्यावर जातात. ते पैलवान म्हशीचे ताजे निरसे दूध विकत घेऊन पितात आणि आखाड्यात मेहनतीसाठी जातात. शिवाय काही लोक पंचगंगेच्या घाटावर आंघोळीसाठी जातात. कोल्हापुरी संस्कृतीचे हे खास वैशिष्ट्य आहे. एकट्या कोल्हापुरात जेवढ्या तालमी आहेत तेवढ्या तालमी महाराष्ट्रातील कोणत्याही शहरात दिसणार नाहीत. त्याचबरोबर इथला गुळही स्वतःचे वैशिष्ट्य असलेला आहे. त्याच्या रंगामुळे आणि गंधामुळे कोणालाही तो गूळ खाण्याचा मोह होतोच.<br>कोल्हापूरप्रमाणे पंढरपुरला स्वतःची वेगळी संस्कृती आहे. येथील संस्कृती वर्षातून दोनदा येणाऱ्या वारीवर बेतलेली आहे. विठ्ठल मंदिर हे येथील संस्कृतीचे केंद्र आहे. त्यामुळे पंढरपुरात खूप मठ आहेत. वारीच्या वेळी महाराष्ट्रातील हरिभक्त आणि वारकरी या मठात उतरतात. इथल्या गल्ल्यांना, चौकांना आणि दुकानांनाही साधुसंतांची नावे दिलेली आहेत. नदीच्या वाळवंटात टाळ मृदुंग फक्त पंढरपुरातच वाजतात. शिवाय येथल्या चंद्रभागा नदीवरील स्नानाला पावित्र्याचा स्पर्श असतो. विठ्ठलाचे ध्यान करीत स्नान केले जाते. स्नानानंतर लोक घरी न जाता प्रथम विठ्ठल मंदिराकडे जातात. त्यानंतर घरी जातात. असे हे भक्तियुक्त मानसिक वैशिष्ट्य दुसऱ्या कुठल्याही मराठी शहरी संस्कृतीमध्ये दिसत नाही.<br>कोल्हापूर, पंढरपूर या शहरांप्रमाणेच रत्नागिरीच्या वेगळ्या संस्कृतीची लेखकाने ओळख करून दिली आहे. लेखक म्हणतात की, रत्नागिरीला लाल लाल मातीच्या रस्त्यांचे सुंदर देखणेपण लाभलेले आहे. समुद्राच्या लाटांचा आवाज वातावरणात गंभीरपणे भरून राहिलेला असतो. येथे पावसाळ्यात आणि हिवाळ्यातही थंडी वाजत नाही, या गोष्टीचे लेखकाला खूप आश्चर्य वाटते. त्याचबरोबर इथला मासळीबाजार खूप मोठा आहे. आणि या मासळी बाजारातील उग्र वास ही रत्नागिरीची एक ओळख आहे. | 8 |

| | | |
|---|---|---|
| 2) | <u>'नातवंडांस पत्र'</u> हा पाठ लेखिका <u>'मृणालिनी साराभाई'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जीवन जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून दिला आहे.<br>लेखिका आपल्या नातवंडांना पूर्णपणे ओळखते. त्यांच्या सवयी तिला माहिती आहेत. जगातील हिंसा, अभिलाषा, मत्सर या दुष्टप्रवृत्तीपासून तिला आपल्या नातवंडांस वाचवायचे आहे आणि म्हणून ती त्यांना म्हणते जेव्हा तुम्ही मोठे व्हाल तेव्हा या शत्रूंना जिंकून घ्या. यासाठी दिवसाची सुरूवात प्रार्थनेने करा. त्यामुळे मनातील वाईट विचार दूर होतील. एकत्र खेळण्याने एकोपा वाढतो. पण असे साधे खेळ खेळतानासुद्धा कुणाचा द्वेष करू नका.<br>ज्या धरतीने तुमचे पालनपोषण केले तिचे ऋण मानायला विसरू नका. पाणी हे जीवन आहे, त्याचा जपून वापर करा. निसर्गाचे संवर्धन करा. निसर्गाचा समतोल कायम ठेवायचा असेल, पाऊस चांगला पडायला हवा असेल तर वृक्षांची जोपासना करायलाच हवी. जो शेतकरी त्याच्या देशासाठी अन्न पिकवतो त्याला किती कष्ट घ्यावे लागतात याचा विचार करा. आपण ब्रेड आणि लोणी ही न्याहारी करताना त्यासाठी कोणी किती कष्ट घेतले असतील याचा विचार करा. पुस्तक हे मित्र आहेत. तेव्हा ती वापरताना त्यांची काळजी घ्या. त्या पुस्तकात अनमोल ज्ञानाचे भांडार असते. पुस्तकातील शब्द म्हणजे मौज, कुतूहल असते. त्या शब्दांवर प्रेम करा. त्यांना वाचा म्हणजे सारे जग तुमच्यासाठी खुले होईल.<br>अशाप्रकारे शेवटी लेखिका आपल्या नातवंडास सांगते, स्वतः जगा व दुसऱ्यास जगू द्या. आपले जीवन इतरांना आनंद देण्यासाठी असावे. सर्वांना मदत करा आणि आपल्या कार्याने साऱ्या जगासाठी तुम्हीच आशीर्वाद व्हा. | **8** |
| उ.**6.** | **अ) खालीलपैकी कोणतेही <u>एक</u> वाक्य लेखननियमानुसार लिहा.** | |
| 1) | **<u>सूतकताई</u>** हे उत्पादक **<u>शारीरिक</u>** परिश्रमांचे प्रतीक मानले जात असे. | **2** |
| 2) | मुलांचे कौतुक **<u>दोघींनाही</u>** सारखेच **<u>प्रिय</u>** असते. | **2** |
| उ.**6.** | **आ) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** | |
| 1) | पंचवटी - पाच वटांचा (वडांचा) समूह - द्विगू समास | **1** |
| 2) | यशापयश - यश किंवा अपयश - वैकल्पिक द्वंद्व समास | **1** |
| 3) | नोकरचाकर - नोकर, चाकर वगैरे - समाहार द्वंद्व समास | **1** |
| 4) | मायलेक - माय आणि लेक - इतरेतर द्वंद्व समास | **1** |
| उ.**6.** | **इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** | |
| 1) | किती विशाल वृक्ष झाला आहे तो आता ! | **1** |
| 2) | त्याच्याशी बोलला नाहीत तर ते वाढणार नाही. | **1** |
| 3) | तू मला चाकू दे. | **1** |

| | | |
|---|---|---|
| उ.**6.** | **ई) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** | |
| 1) | पंढरपुरच्या वारीत वारकरी मोठ्या संख्येने <u>सहभागी झाले</u>. | **1** |
| 2) | 'कोकणस्थ' चित्रपटात सचिन खेडेकर यांनी कोकणी माणसाची <u>भूमिका वठविली</u>. | **1** |
| 3) | स्वातंत्र्याच्या काळात अनेक क्रांतिकारकांनी <u>भूमिगत राहून</u> काम केले. | **1** |
| 4) | आपल्या मुलांवरील आईची माया कधीही <u>क्षीण होत नाही.</u> | **1** |
| 5) | अजय धावाधाव करून अकोल्याच्या शाळेत <u>दाखल झाला</u>. | **1** |
| 6) | खूप मेहनत करून आपल्याला कोणतीही गोष्ट <u>प्राप्त करता येते</u>. | **1** |
| उ.**7.** | **अ) खालील उतारा वाचून त्यावर <u>चार</u> प्रश्न तयार करा.** | |
| 1) | कोणती गोष्ट त्रिकालाबाधित सत्य आहे ? | **1** |
| 2) | कोणते ग्रंथ आमच्या पराक्रमाची आणि कर्तृत्वाची ग्वाही देतात ? | **1** |
| 3) | निग्रो लोकांच्या गुलामगिरीचे कारण कोणते आहे ? | **1** |
| 4) | साहित्याचा उपयोग अधिक कोठे झालेला आढळून येतो ? | **1** |
| उ.**7.** | **आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य <u>शीर्षक</u> देऊन <u>तात्पर्य</u> लिहा. (कोणतीही एक)** | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 64 - Q.23 | **4** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 61 - Q.17 | **4** |
| उ.**7.** | **इ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर पत्र लिहा.** | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 95 - Q.10 | **4** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 89 - Q.04 | **4** |
| | **<u>किंवा</u>** | |
| उ.**7.** | **इ) खालील विषयावर वृत्तांत लिहा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 104 - Q.11 | **4** |
| | **<u>किंवा</u>** | |
| उ.**7.** | **इ) खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 113 - Q.13 | **4** |
| उ.**8.** | **खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 26 - Q.23 | **10** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 42 - Q.38 | **10** |
| 3) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 14 - Q.12 | **10** |
| | ❑❑❑❑❑ | |